# अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मुख्य कार्यालय, अमरावती

जा.क्र.६१/लेखाविभाग/२१० दि. २१.०६.२०२१

***प रि प त्र क***

प्रति,
शाखा व्यवस्थापक, (सर्व)
शाखा :- ------------------------------------

**विषय :- मुदती ठेवीचे सुधारीत व्याजदराबाबत.**

उपरोक्त विषयानुसार मुदती ठेवींच्या व्याजदराची इतर बँकांसोबत तुलना करता आपल्या बँकेचे व्याजदर ज्यादा असल्याने सदरचा परिणाम बँकेच्या नफाक्षमतेवर होत आहे. करीता बँकेचे मा.प्रशासकिय सभा दि.१५.०६.२०२१ चे ठराव क्र.११ अन्वये बँकेचे मुदती ठेवीवरील व्याजदर खालीलप्रमाणे लागु करण्यात येत असुन सदर व्याजदर हे बँकेचे ग्राहकांना **दि.१.७.२०२१** पासुन लागु राहतील.

| मुदती ठेवीचा कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ७ ते १४दिवसांकरीता | ३.५०% |
| १५ ते ४५ दिवसांकरीता | ४.००% |
| ४६ ते १८० दिवसांकरीता | ४.५०% |
| १८१ ते २७० दिवसांकरीता | ५.००% |
| २७१ दिवस ते २४ महीने पर्यंत | ५.५०% |
| २४ महीने १ दिवस ते ३६ महीने पर्यंत | ५.७५% |
| ३६ महीने १ दिवस व त्यावरील कालावधीकरिता | ६.००% |

वरील सुधारीत व्याजदराशिवाय जेष्ठ नागरीक व बँकेच्या आजी/माजी कर्मच्याऱ्यांना खालीलप्रमाणे जादा व्याजदराची सवलत लागू राहील.

१) जेष्ठ नागरीकास मुदती ठेवीवर ०.५०% (अर्धा टक्का) व बँकेच्या आजी/माजी कर्मच्याऱ्यांना १% जादा व्याजदराची सवलत देण्यात येईल.

२) अ) जेष्ठ नागरीक माजी कर्मचारी असेल तरीही त्याना जादा व्याज सवलती बाबतीतील क्र.१ मधील कोणतीही एकच सवलत लागू राहील.

ब) भारतीय रिझर्व बँकेचे सुचनेनुसार बँकेचे आजी व माजी कर्मच्याऱ्यांपेकी सामान्य अनिवासी (एन.आर.ओ.) व अनिवासी बाह्य (एन.आर.ई) असतील तर त्यांना १% जादा व्याजदराची सवलत देता येणार नाही .

O/C

३) जेष्ठ नागरीकांचा अर्ज घेऊन वयाचे खात्री बाबत अधिकृत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

४) बँकेचे आजी/माजी कर्मचाऱ्यांकडून मुदत ठेव प्राप्त होत असल्यास व त्यांना १% जादा व्याजदराची सवलत पाहीजे असल्यास संबधीतांकडून Own Money Declaration form भरून घ्यावा.

वरीलप्रमाणे मुदती ठेवीवरील नव्याने सुधारीत व्याजदराची माहिती शाखेच्या नोटीस बोर्डवर लावण्यात यावी तसेच सर्व संबधीत कर्मच्याऱ्यांनी नोंद घेवून ठेव वाढीसंबधाने जास्तीत जास्त प्रचार व प्रसार करून आपल्या शाखेच्या ठेवीच्या लक्षांकाची पूर्तता करावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी

**प्रतिलीपी कार्यवाहीस्तव :-**

**१) वरीष्ठ क्षेत्रीय अधिकारी / क्षेत्रीय अधिकारी**
तालुका :- ---------------------

आपले अख्त्यारीतील शाखांच्या ठेवीच्या लक्षांकाची पूर्तता होणेसाठी कासा तसेच मुदती ठेवीमधील ठेवीत वृध्दी होणेकरीता अधिकतम प्रयत्न करावेत.

**२) सहा.अधिकारी (संगणक), मु.का.अमरावती**

परिपत्रकात नमुद केल्याप्रमाणे मुदती ठेवीवरील नविन व्याजदर संगणकात अद्यावत करावेत. जेणेकरून सदरची पूर्तता शाखास्तरावर **दि.०१.०७.२०२१** पासुन करता येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी

**प्रतिलीपी माहीतीस्तव :-**

**३) मुख्याधिकारी -------------------- विभाग,**
मुख्य कार्यालय, अमरावती

मुख्य कार्यकारी अधिकारी

ACCOUNT FOLDER २०२१/PARI DT.२१.६.२०२१